# राशिभविष्य - जुलै, २०११.

दादा दामले (dadadamle@hotmail.com)

==========================================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण मंगळ प्रतिकुल असल्याने आर्थिक येणे असल्यास त्यात अडचणी, घोटाळे होणे संभवते. तसेच काहींना अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक श्रम, दगदग होऊन अनारोग्यास सामोरे जावे लागणेही नाकारता येत नाही. शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात काहीही कारणाने किंवा गैरसमजाने बाधा येऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची दाट शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी बनून गृहसौख्यही लाभेल. कुमार्गी मंडळींपासून मात्र सावध व दूर राहणेच योग्य होईल. शनि चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यात मग्न आहेत त्यांना प्रगतीच्या व यशाच्या दृष्टीने अनुकुल होईल. या राशीच्या काहींना वाममार्ग धन सहज मिळण्याची शक्यता दिसत असली तरी त्यांनी अशा मार्गाचा अवलंब टाळावा. या राशीच्या लेखकांचे लेखन पुस्तकरूपाने प्रसिद्ध होण्याची शक्यताही दिसते. महिन्याचा अखेरच्या सप्ताहात संततीच्या अनारोग्यामुळे किंवा अयोग्य आचरणामुळे मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना श्रम आणि दगदगीमुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लगण्याची शक्यता आहे. विशष करून महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी असह्य मनस्ताप होऊनच सर्व प्रकारचे अनारोग्य होणे शक्य आहे. काळ अनुकुल नाही, ही गोष्ट ध्यानात घेऊन संयम व सहनशीलतेचे आचरण केल्यास होणारा त्रास सुसह्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती निवळेल व सर्व सुखाचे असेच घडेल. अध्यात्म, समाजकार्य अशा क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना अपेक्षापूर्तीसाठी महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणास आलेले नैराश्य, कोणास झालेला आजार वा इजा, कोणास असलेला कसला तरी मानसिक त्रास अशापैकी कारणांनी संततिसंबंधी चिंता उत्पन्न होणे संभवते.. या राशीच्या पंचम स्थानी असलेला शनि चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यावसायिक अस्थिर परिस्थितीला सामोरे जावे लागेल. पण मानसिक रोग तज्द्न्य व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुले त्यांनी घरीदारी, सर्व ठिकाणी संयम आणि सहनशीलतेने आचरण करूनच काळ व्यतीत करावा. तेच सुखाचे होईल. त्यातल्या त्यात सुखाची बाब म्हणजे वैवाहिक सुखी जीवनाला धक्का लागणार नाही; आणि महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान मिळण्याची शक्यता दिसते. रवि-मंगळासारखे प्रभावी व तापट ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे

आरोग्यविघातक होण्याचीच शक्यता आहे. सतत मनाविरुद्ध घटना घडत असल्याचा अनुभव येईल व हाती घेतलेल्या कार्यात सतत अडथळे निर्माण होतील. अशा परिस्थितीत मन व बुद्धी शांत ठेवून नम्रतेचे आचरणच तारक ठरेल. चिकित्सक शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना व राजकारणात असलेल्या मंडळींना मात्र काळ थोडा अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्म, उपासना अशा क्षेत्रांत रस आहे, अशांना उपासनेत अपेक्षित असे सात्विक सुखसमाधान व मन:शांती लाभेल. या राशीच्या ज्या मंडळींचा परजाति-धर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळेच विविध प्रकारचे लाभ होतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना किंवा दत्तोपासना अनुकुल होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. विविध कारणांनी सतत वाद होत असल्यामुळे गृहसौख्याला तडा जाऊ शकेल. जपा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात अनुकुल-प्रतिकुल असे संमिश्र स्वरूपाचे अनुभव येतील. काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईल, तर काहींना कष्ट, परिश्रम करूनच अपेक्षित अशी आर्थिक प्राप्ती मिळविण्याचा प्रयत्न करावा लागेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात विविध कारणांनी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळेच शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळींना रक्तदाब, हृदयविकार असे आजार आहेत त्यांनी तर मन सतत शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करावा, हेच उत्तम. काहींना गलितगात्र करणारा थकवा जाणवेल. पण मधून मधून शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व मन ब बुद्धीवर येणारा असह्य ताण सुसह्य होईल. या राशीच्या काही तरुणांना अपेक्षित अशी नवी मिळणे संभवते. तसेच काहींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही जाणवते. विशेष करून चिकित्सक बौद्धिक शास्त्रीय संशोधन क्षेत्र, शिक्षणक्षेत्र, वकिली व्यवसाय तसेच कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विविध कारणांनी या राशीच्या मंडळींना संततिविषयक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना दूरच्या किंवा परदेश प्रवसाचे योग येतील. जलभय, विषभय आहे. जपा.

**(५) सिंह -** शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना व वैद्यकीय, यांत्रिक-तांत्रिक व्यवसाय करत असणाऱ्या या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच घरीदारी सुखसमाधान देणारा असा असेल. पण अगदी खासगी नोकरदार मंडळींना कामाचा ताण, मालकाशी वितुष्ट, मनस्ताप अशापैकी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. उत्तरार्धात मात्र चित्र पालटेल व या राशीच्या सर्वांनाच मन अस्वस्थ करणाऱ्या घटना घडून मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. या काळात मित्रांशी वितुष्ट येण्याचीही शक्यता आहे. जपा. कौटुंबिक, वैवाहिक व गृहसौख्य या दृष्टीने काळ प्रतिकुलच असल्याचा अनुभव येईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व बरे वाटेल. धनस्थानी असलेल्या शनिमुळे व साडेसातीचा अखेरचा साडेचार महिन्यांचा भाग बाकी असल्यामुळे मन व बुद्धीवर ताबा ठेवून आणि जिभेला लगाम घालून आचरण केलेत तर सर्व सुखाचेच होईल. अध्यात्म, उपासना आदिची मनापासून आवड असेल उपासनेमुळे मनाची अस्थिरता व बुद्धीची चंचलता कमी होण्यास मदत होईल. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. आर्थिक

संकटे येणार नाहीत याची काळजी घ्या. विचाराच्या तंद्रीत चालू नका, वाहने हाकू नका. अपघतभय आहेच. काहींना दूरच्या प्रवासाचा वा परदेशगमानाचा योग येईलसे दिसते. श्रद्धा असेल तर मारुतीची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, अपेक्षित असे मनासारखे काही न घडणे, कुटुंबातील काही मंडळींचे स्थलांतर होणे, भावंडसुखात बाधा येणे अशापैकी घटनांनी गहरे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. तसेच आर्थिक फ़सवणूक होणे संभवते. जपा. तरीही या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना व वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. पण त्याच वेळी सदसद्विवेक बुद्धी विकृत होणार नाही, याची काळजी घ्या. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होईलसे दिसते. या राशीच्या काहींना नवे मित्र मिळतील व त्यांच्यामुळे अनुकुल घटना घडतील. या राशीच्या ज्या मंडळींचे भागीदारीत व्यापार-व्यवसाय असतील त्यांनी भागीदारीत संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच या राशीच्या कोणाची कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. या राशीच्या काहींना उगाचच काल्पनिक आजारभावना होईल व काही करू नयेसे वाटेल. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येऊ शकेल. जपा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे ग्रहमान प्रतिकुलच आहे. त्यात शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आहे. अशा परिस्थितीत मन-बुद्धी चंचल, अस्थिर होते व कळत, न कळत हातून नको ते घडते. काळ प्रतिकुल आहे, ही बाब सतत ध्यानात घेऊन वर्तमान परिस्थितीतच सुखासमाधानाने काळ कसा व्यतीत करता येईल ते ठरवा व त्यानुसार आचरण करा. " महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती " हे तुकोबांचे वचन ध्यानात ठेवून आचरण करा. तरच सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील, आर्थिक नुकसान टळेल, कौटुंबिक कलह टळतील, होणारा मनस्ताप सुसह्य होईल व शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मिळणाऱ्या सुखद गारव्याचा आनंद अनुभवता येईल. दिनांक ९-१० हे दोन दिवस विशेष जपा. महिन्याचा उत्तरार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल व सुखद असाच असेल. अति विचार करून मेंदूला ताण देऊ नका. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अति हल्लक, भावविवश होणे शक्य आहे. म्हणून मन:शांतीसाठी थोडी साधना, उपासना करा. तेच सुखाचे होईल. अशा प्रतिकुल काळातही या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. गर्भवती स्त्रियांना पुत्रप्राप्ती संभवते. काही मंडळींना नवे मित्र मिळतील, नवे स्नेहसंबंध जुळतील, काहींना प्रवासयोग येईल. महिन्याच्या अखेरच्या काळात शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ हे दादा ग्रह अत्यंत प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे घरीदारी सतत मनाविरुद्ध घटना घडून शारीरिक उष्णता भडकेल व उष्णतेचे आजार होणे संभवते. अपघात भय आहे. पाण्यापासून, विजेपासून जपा. वैवाहिक जीवनात मतभेदांमुळे किंवा अन्य कारणाने एकोप्याचे संबंध बिघडणार नाहीत, याची काळजी घ्या. तसेच या

राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारी व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी मतभेद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. शास्त्रीय संशोधन, वकिली, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याच्या शेवटचे दहा दिवस प्रगतिकारक व लाभदायक होतील. अकारण अनारोग्य होणार नाही. घरगुती संबंधात गैरसमजुती, घोटाळे, वा अन्य कारणांनी बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. बुध-शुक्राची बरीच अनुकुलता आहे; तोपर्यंत बौद्धिक, कलात्मक क्षेत्रात रस असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. .

(९) **धनु -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक होईल. उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. अति तिखट पदार्थांची आवड असणारांनी विशेष काळजी घ्यावी. मूळव्याध, अल्सर, अंगावर फ़ोड येणे, इजा होणे असे त्रास संभवतात. या राशीच्या काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होण्याची शक्यता आहे. दांपत्यजीवनात गैरसमजाने किंवा संशयाने वाद, भांडणे होणे किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे चिंता निर्माण होणे, असे काही तरी घडेलसे दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे गृहसौख्य व वास्तुसुख लाभण्यात अडथळे निर्माण होतील. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. गुरु ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना सहज रीत्या शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होईल. इतरांना विविध प्रकारचे लाभ होतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांना पुत्रलाभ होण्याची शक्यता आहे. लोखंड, कोळसा, खाण उद्योग असणारांना इतरांपेक्षा काळ अधिक अनुकुल व लाभदायक होईल. तसेच शास्त्रीय संशोधन, वकिलीसारखे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या मंडळींना अनपेक्षितपणे विविध प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. सामोपचाराचे आचरण व उत्तम आरोग्य राखलेत तर सर्व काही सुखाचेच होईल.

(१०) **मकर** - या राशीच्या मंडळींना अनुकुल-प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा असा या महिन्याचा काळ असल्याचे दिसून येईल. गुरुमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण इतर संबंधितांकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. तसेच विविध करणांनी संततिसुखात बाधा येणेही शक्य आहे. मुलांचे आजारपण, अयोग्य आचरण, कोणास आलेले गहरे नैराश्य अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. अशाच कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होणेही नाकारता येत नाही. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अपप्रचार, संताप आणि असह्य मनस्ताप यांमुळे शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होईल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. नंतर अनारोग्य, नैराश्य यांमुळे काही करू नयेसे वाटेल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्येकडे लक्ष द्यावे लागेल. उच्च शास्त्रीय संशोधन, व अन्य बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र आर्थिक व्यवहार अत्यंत सावधानतेने होणे आवश्यक आहे. नपेक्षा आर्थिक घोटाळे, फ़सवणूक अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता निर्माण होऊ शकेल. या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्गधन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह त्यांनी कटक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व शीघ्र मानसिक संवेदना व्यक्त होणारे असे झाले असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत गैरसमज, असमाधानकारक घटना, राहत्या जागेसंबंधी किंवा वास्तूसंबंधी वाद वा त्रास, तसेच त्यात कौटुंबिक भांडणतंट्यांची भर पडली तर ! असे घडू नये म्हणून मनावर संयम ठेवा, सहनशील व्हा, जिभेवर ताबा ठेवा आणि काय काय घडते ते नुसते पाहा. प्रतिकुलतेचा वादळी काळ निघून जाईल; व आपण सुरक्षितच राहाल. त्यामुळे भावंडांच्या सुखात येणारी बाधाही टळेल. कोणत्याही परिस्थितीत आरोग्यसंपन्नतेकडे दुर्लक्ष करू नका. या राशीच्या लेखनकलेची आवड असणारांचे ग्रंथलेखन चालू असेल तर ते पूर्णत्वास जाण्यास काळ अनुकुल होईल. महिन्याचा उत्तरार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अधिक अनुकुल व आनंददायक होईल. या राशीच्या धनस्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्याने हातून अविचाराचे आचरण घडण्याची व अविचाराने खर्च होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासेतर गोष्टींचा मोह टाळून व उत्तम आरोग्य राखून अध्ययन केले तरच शिक्षणात अडथळे येणार नाहीत व अपेक्षित प्रगती साधणेही होईल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणाऱ्या कर्तृत्वसंपन्न मंडळींना महिन्याच्या उत्तरार्धात बढती, अधिकारपद मिळण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत लहरी, चंचल व अस्थिर झाला असण्याची शक्यता आहे. पण मन मात्र कोमल, भावनाप्रधान असल्यामुळे बुद्धी आणि मन यांच्यात ओढाताण होत असल्याचा अनुभव येत असेल. म्हणून आपल्या अस्थिर स्वभावावर नियंत्रण ठेवा, मन व बुद्धी स्थिर राखा आणि सहनशील बनून दैनंदिन आचरण करा. तरच शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या अनुकुलतेचा लाभ उठवू शकाल. या राशीच्या ज्या मंडळींचा बागाईत शेतीचा व्यवसाय आहे त्यांना या महिन्याचा अधिकतम काळ अनुकुल व लाभदायक होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यापार-व्यवसायात अपेक्षित प्रगती व वाढ होणे संभवते. कर्जफ़ेडीची चिंता दूर होण्याची शक्यताही दिसते. केवळ विचारपूर्वक व योजनाबद्ध कार्यवाही होणे गरजेचे आहे. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, आर्किटेक्चर, कलात्मक व्यापार-व्यवसाय असणारांना महिन्याचा २२ तारखेपर्यंतचा काळ अतिशय अनुकुल, प्रगतिकारक व अर्थलाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या काही दिवसांत कौटुंबिक सुख व गृहसौख्यात बाधा येण्याचा संभव आहे. या राशीच्या युवकांनी कुसंगतीपासून दूर राहिल्यास कल्याणच होईल. जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल.

=====00000=====